बीड । महाराष्ट्र
गुरूवार दि. १२ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३३९
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










## परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता ३०० कोटींचा होणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# धनंजय मुंडेंनी केलेली मागणी फडणवीसांनी केली पूर्ण!

**मुंबई । वृत्तसेवा**

**परळी येथील पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिर व परिसराचा विकासासाठी धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या सुधारित ३०० कोटींच्या प्रस्तावास शिखर समितीच्या माध्यमातून मान्यता देण्यात येणार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत अर्थसंकल्पीय चर्चेच्या उत्तरादरम्यान जाहीर केले.**

प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत विविध कामे सुरू आहेत. या आराखड्यातील रक्कमेत वाढ करून या अर्थसंकल्पीय वर्षात वाढीव निधी देण्याची विनंती आ. धनंजय मुंडे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली होती. अजित दादानी या आराखड्यात वाढ करण्याची सूचना केली होती, असा उल्लेखही देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात केला. दरम्यान या विकास आराखड्यातून एक भव्य भक्त निवास उभारण्यात आले असून, त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे, त्याचबरोबर दर्शन मंडपाच्या चौथ्या मजल्याचे काम सुरू आहे, तर दुसरीकडे प्रवेश द्वारकडील दगडी पायऱ्या, डोंगर तुकाई स्थानाचा विकास, दगडी प्रवेशद्वार, यांसह विविध कामे सुरू आहेत. या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी स्व. अजितदादा काही दिवसांपूर्वी परळीत आले तेव्हा वाढीव निधी सह विविध कामांच्या टप्प्यांची चर्चा झाली होती. आज याबाबत मुख्यमंत्री महोदय यांनी अधिकृत घोषणा केल्याने, धनंजय मुंडे यांनी स्व. अजितदादा यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या कामाला आता आणखी गती मिळणार आहे.



# अडुळा वाळू घाटावर माफियांची खुलेआम लूट

**माजलगाव । प्रतिनिधी**

अडुळा परिसरातील वाळू घाटावर बेकायदेशीर वाळू उपसा थांबण्याचे नाव घेत नाही. उलट दिवसेंदिवस माफियांचा उच्छाद वाढत असून प्रशासन मात्र संशयास्पद शांततेत असल्याची भावना स्थानिकांमध्ये निर्माण झाली आहे. पहिल्या भागात या प्रकरणातील गंभीर बाबी समोर आल्यावरही संबंधित यंत्रणांनी कोणतीही ठोस कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अडुळा नदीपात्रात मोठमोठ्या मशीनच्या साहाय्याने रात्रंदिवस वाळू उपसा केला जात आहे. ट्रॅक्टर आणि डंपरच्या मदतीने हजारो ब्रास वाळू बाहेर काढली जात असून नदीचे नैसर्गिक स्वरूप धोक्यात आले आहे. पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असताना संबंधित विभाग मात्र कारवाईकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे. स्थानिक ग्रामस्थांनी महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाकडे वारंवार तक्रारी दिल्या असल्याचे सांगितले जाते. मात्र, या तक्रारींवर ठोस पावले उचलली गेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. काही ठिकाणी तर माफियांच्या दबावामुळे अधिकारी कारवाई करण्यास कचरत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. बेकायदेशीर वाळू उपशामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असूनही संबंधित यंत्रणा गप्प का आहे, असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत. प्रशासन नेमके कोणाच्या दबावाखाली आहे? असा थेट सवालही स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, अडुळा वाळू घाटावरील हा प्रकार तात्काळ थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा स्थानिकांकडून देण्यात आला आहे.

### प्रशासनाची शांतता!

## पाहिजेत

इंडियन एज्युकेशन सोसायटी पुणे संचलित स्वामी समर्थ प्राथमिक व माध्यमिक विद्यालय पिरेवाडी तालुका पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर. यांच्याकडे खालील जागा त्वरित भरणे आहेत.

**सहशिक्षक / सहशिक्षिका**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | हिंदी | ०२ जागा | अर्हता | B.Ed./D.Ed |
| २) | विज्ञान | ०२ जागा | अर्हता | M.Sc./B.Sc., B.Ed/D.Ed |
| ३) | इंग्रजी | ०२ जागा | अर्हता | B.Ed./D.Ed |
| ४) | गणित | ०२ जागा | अर्हता | M.Sc./B.Sc./M.Com/B.Ed./D.Ed |
| ५) | मराठी | ०२ जागा | अर्हता | B.Ed./D.Ed |
| ६) | सामाजिक शास्त्र | ०२ जागा | अर्हता | Ba. B.ed. |

पात्र व इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज शनिवार, दि. २१ मार्च २०२६ सकाळी १०.३० ते ३.०० या वेळेत सर्व कागदपत्रांसह खाली दिलेल्या पत्यावर दाखल करावेत.

पत्ता : स्वामी समर्थ प्राथमिक व माध्यमिक विद्यालय पिरेवाडी, ता. पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर

ऑफीस संपर्क : स्वामी समर्थ प्राथमिक व माध्यमिक विद्यालय पिरेवाडी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर : ७७४५०६०९९८/९११२०६०९९८

## राज्यातील हुंडा प्रथेचे भीषण वास्तव

# आ.नमिता मुंदडांनी सभागृहात मांडले

**मुंबई । वृत्तसेवा**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र विधानसभा सभागृहात हुंडाबळी आणि महिलांवरील अत्याचाराचा प्रश्न चांगलाच गाजला. केज विधानसभेच्या आमदार नमिता मुंदडा यांनी लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान राज्यातील हुंडा प्रथेच्या भीषण वास्तवावर प्रकाश टाकला. लग्नासारख्या पवित्र नात्याला हुंड्यामुळे आर्थिक व्यवहाराचे स्वरूप प्राप्त झाले असून ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या २०२३ च्या आकडेवारीचा हवाला देत त्यांनी सांगितले की देशात हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत १५ हजारहून अधिक गुन्हे नोंदवले गेले असून ६ हजारहून अधिक महिलांना हुंड्यासाठी जीव गमवावा लागला आहे. ▶▶ पान २ वर

## पाहिजेत

इंडियन एज्युकेशन सोसायटी पुणे संचलित राका फॅमिली व सेकंडरी इंग्लिश स्कूल पिरेवाडी तालुका पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर यांच्याकडे खालील जागा त्वरित भरणे आहेत.

**सहशिक्षक / सहशिक्षिका**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | हिंदी | ०२ जागा | अर्हता | B.Ed./D.Ed |
| २) | विज्ञान | ०२ जागा | अर्हता | M.Sc./B.Sc., B.Ed/D.Ed |
| ३) | इंग्रजी | ०२ जागा | अर्हता | B.Ed./D.Ed |
| ४) | गणित | ०२ जागा | अर्हता | M.Sc./B.Sc./M.Com/B.Ed./D.Ed. |
| ५) | मराठी | ०२ जागा | अर्हता | B.Ed./D.Ed |
| ६) | सामाजिक शास्त्र | ०२ जागा | अर्हता | Ba. B.ed. |
| ७) | LKG / UKG | ०२ जागा | अर्हता | बारावी व पदव्युत्तर तज्ञ शिक्षक / शिक्षिका |

पात्र व इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज शनिवार, दि. २१ मार्च २०२६ सकाळी १०.३० ते ३.०० या वेळेत सर्व कागदपत्रांसह खाली दिलेल्या पत्यावर दाखल करावेत.

पत्ता : राका प्राइमरी व सेकंडरी इंग्लिश स्कूल पिरेवाडी, ता. पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर.

ऑफीस संपर्क : राका प्रायमरी व सेकंडरी इंग्लिश स्कूल पिरेवाडी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर ७७४५०६०९९८/९११२०६०९९८

## पाहिजेत

इंडियन एज्युकेशन सोसायटी पुणे संचलित प्रीतम ताई चव्हाण आर्ट अँड सायन्स कॉलेज पिरेवाडी तालुका पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर यांच्याकडे खालील जागा त्वरित भरणे आहेत.

**प्राचार्य (M. Sc. B. Ed./M.Ed.)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | हिंदी | ०२ जागा | अर्हता | B.Ed. |
| २) | विज्ञान | ०३ जागा | अर्हता | M.Sc./B.Sc., B.Ed/D.Ed |
| ३) | इंग्रजी | ०२ जागा | अर्हता | B.Ed. |
| ४) | गणित | ०२ जागा | अर्हता | M.Sc./B.Sc/M.Com/B.Ed. |
| ५) | मराठी | ०२ जागा | अर्हता | B.Ed. |
| ६) | सामाजिक शास्त्र | ०२ जागा | अर्हता | Ba |

पात्र व इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज शनिवार, दि. २१ मार्च २०२६ सकाळी १०.३० ते ३.०० या वेळेत सर्व कागदपत्रांसह खाली दिलेल्या पत्यावर दाखल करावेत.

प्रीतम ताई चव्हाण आर्ट अँड सायन्स कॉलेज पिरेवाडी, ता. पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर.

ऑफीस संपर्क : प्रीतम ताई चव्हाण आर्ट अँड सायन्स कॉलेज पिरेवाडी ,तालुका पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर ७७४५०६०९९८/९११२०६०९९८

## संपादकीय

# हॉटेल व्यवसाय अडचणीत

आखाती देशात युद्धाची आग धुमसत असल्याने भारताला होणारा खनिज तेलाचा आणि नैसर्गिक वायू पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात घरगुती गॅस, व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. हॉटेल व्यवसाय तर बंद पडण्याच्या मार्गावर आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याने मुंबईतील २० टक्के हॉटेल्सचे शटर्स खाली आले आहेत. दोन-तीन दिवसांत हे प्रमाण ५० टक्क्यांवर जाईल अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. गॅस सिलिंडरचा तुटवडा लक्षात घेता केंद्र सरकारने देशभरात ‘एस्मा’ म्हणजेच आवश्यक सेवा पुरवठा अधिनियम कायदा लागू केला आहे. देशात गॅसअभावी उद्योग ठप्प होत चालले आहेत, हॉटेल व्यवसाय संकटात आहे, खाद्य तेल महाग होत आहे तसेच इंटरनेट सेवाही ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. एस्मा कायद्याच्या कक्षेत सार्वजनिक संरक्षण, स्वच्छता, जल पुरवठा, रुग्णालये आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या संबंधित सेवा येतात. पेट्रोलियम, कोळसा, वीज, पोलाद आणि खनिज उत्पादन तसेच वितरणाशी निगडीत संस्था आणि कंपन्या या कायद्याच्या कक्षेत येतात. याशिवाय बँकिंग सेवाही एस्माच्या कार्यकक्षेत येते. सार्वजनिक वाहतूक, दळणवळण आणि खाद्यपुरवठा खरेदी आणि वितरण संबंधित संस्थांना ‘एस्मा’ कायद्याचे पालन करणे अनिवार्य असते. गॅसचा तुटवडा जाणवू लागल्याने केंद्र सरकारने ‘एस्मा’ कायद्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यामुळे आता देशभरात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजार करण्यावर प्रतिबंध राहील. देशात कच्च्या तेलाप्रमाणे एलपीजीचा साठा कमी होत चालला आहे. २ ते ३ आठवडेच पुरवठा होऊ शकेल असा अंदाज आहे. गॅस तुटवड्याची झळ हॉटेल्स आणि सर्वसामान्यांना बसू लागली आहे. युद्धामुळे खाद्य तेलाचे दरही वाढत चालले आहेत. आठवडाभरात तेलाच्या दरात मोठी भाववाढ होऊ शकेल. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने हॉटेल आणि खानावळ व्यावसायिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. हे व्यवसाय नियमित गॅस पुरवठ्यावर अवलंबून असल्याने व्यवसाय कसा करावा असा प्रश्न व्यावसायिकांना पडला आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय स्तरावर पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्याने जागतिक इंधन पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असल्याचे सांगितले जात असले तरी, पेट्रोलियम कंपन्यांनी एलपीजी सिलिंडरचा पुरवठा प्राधान्याने घरगुती ग्राहकांना करण्याचे निर्देश दिले आहेत. घरगुती सिलिंडरही पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने व्यावसायिक सिलिंडर मिळणे कठीण झाले आहे. याचा फटका मोठ्या शहरातील हॉटेल व खानावळ व्यावसायिकांना बसत आहे. जागेचे भाडे, कर्मचा-यांचे पगार, वीज बिल आणि इतर खर्च कायम असताना गॅस पुरवठा कमी झाल्याने व्यवसाय चालवणे अवघड झाले आहे. काही जण इलेक्ट्रिक इंडक्शन, चुली किंवा अन्य पर्यायांचा विचार करत आहेत. मात्र, हे पर्याय महाग असल्याने उत्पादन आणि नफ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. खानावळीत प्रामुख्याने स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी जेवतात. खानावळी बंद झाल्यास या विद्यार्थ्यांना अडचण येऊ शकते. काही खानावळी कमी पदार्थ देणे किंवा चुली-कोळशाचा वापर करून सेवा सुरू ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, यामुळे शहरातील वायुप्रदूषण वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हॉटेल व्यवसायासाठी गॅस अत्यावश्यक आहे. काही दिवस एजन्सीकडून पुरवठा झाला. मात्र, पुढे तो सुरू राहील याची खात्री नाही. इलेक्ट्रिक शेगडीचा पर्याय असला तरी वीज खर्च मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. मध्य पूर्वेतील युद्धामुळे शेअर बाजारात उलथापालथ होत असून डॉलर भडकला आहे. एक डॉलर खरेदी करण्यासाठी ९२ रुपयांपेक्षा अधिक किंमत मोजावी लागत आहे. कच्च्या तेलाचे भाव गगनभरारी मारत असून, ही कळ आणखी काही काळ सोसावी लागेल असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. आजवर त्यांनी दिलेली अनेक आश्वासने फोल ठरली आहेत. जगातील करोडो लोकांना ट्रम्प यांनी प्रथम व्यापारी युद्धात आणि नंतर प्रत्यक्ष युद्धात लोटले आहे. त्याची जबर किंमत सामान्य माणसांना सोसावी लागत आहे. घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची तर व्यावसायिक सिलिंडरच्या दरात ११५ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने घेतला आहे. जागतिक स्तरावर ऊर्जेची किंमत वाढल्यामुळे ही वाढ आवश्यक असल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत अद्याप वाढ होणार नसल्याचे सांगण्यात येत असले तरी आज ना उद्या ते दर वाढवावेच लागतील. या सा-या गोष्टींमुळे हॉटेलमधील दर वाढणार असून भाज्या, फळे आणि अन्य सर्व प्रकारच्या वस्तूंची महागाई वाढणार आहे. काही दिवसांनी सरकारला इंधनाचे दर वाढवावेच लागतील. ते टाळायचे असेल तर सरकारला इतर कोणत्याही प्रकारचे कर वाढवावे लागतील. काहीही झाले तरी या युद्धामुळे गोरगरीब आणि मध्यमवर्गाच्या हलाखीत भर पडणार आहे. युद्धपरिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय वाहतुकीवर परिणाम झाला असून भारताच्या खतपुरवठ्याला देखील फटका बसू शकतो. भारत अन्नधान्याबाबत तेलबिया आणि डाळींचा अपवाद वगळता स्वयंपूर्ण आहे. परंतु खतपुरवठ्याबाबत तसे म्हणता येणार नाही. गतवर्षी भारताने एक कोटी टन युरिया आणि ६० लाख टन डीएपी खतांची आयात केली होती. ओमान, कतार, सौदी अरेबिया, यूएई आणि बहरीन येथून भारत युरियाची ७५ टक्के गरज भागवतो. डीएपी प्रामुख्याने सौदी अरेबियातून आणले जाते. भारताला दरवर्षी ३० लाख टन एमओपी(पोटॅश) आयात करावे लागते. कृषी उत्पादनासाठी खतांची मोठी गरज असते आणि त्याबाबत आपली शेती भूराजकीय स्थितीवर अवलंबून असते हे या युद्धामुळे लक्षात येते. युद्धस्थिती आणखी गंभीर झाल्यास भारतातील नैसर्गिक वायू, कच्चे तेल त्याचबरोबर खतांच्या पुरवठ्याला झळ पोहोचू शकते. तसे झाल्यास शेती उत्पादनावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. युद्धामुळे इंटरनेट सेवाही ठप्प होण्याची शक्यता आहे. कारण होर्मुझची सामुद्रधुनी हा एक डिजिटल चेकपॉईंट आहे.

## मोटरसायकल मेंढ्यांनी पाडल्याने झाला वाद

# व्हिडिओ काढतो? म्हणत शिवीगाळ करत लाकडाने कुऱ्हाडीने मेंढपाळ दोन भावांना मारहाण

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील घळाटवाडी शिवारात दोन मेंढपाळ बांधवांवर हल्ला झाल्याची घटना दि. ११ बुधवारी घडली असून या प्रकरणातील आरोपींना अटक करण्याची मागणी सकल धनगर ओबीसी समाजाच्या वतीने ग्रामीण पोलिसांकडे निवेदनाद्वारे दि. ११ बुधवारी करण्यात आली आहे. ग्रामीण पोलिसांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वडवणी तालुक्यातील पुसरा येथील मेंढपाळ निवृत्ती चंदू बिडे व लहू चंदू बिडे हे माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी शिवारात मेंढ्या चारत असताना झालेल्या वादातून शिवीगाळ गणेश पांडुरंग नरवडे व आनंद पांडुरंग नरवडे यांनी या दोघांवर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात जखमी झालेल्या दोन्ही मेंढपाळांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे सकल धनगर ओबीसी समाजात संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, आरोपींवर तात्काळ गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अन्यथा दि. १२ गुरुवार पासून ग्रामीण पोलीस स्टेशनसमोर सकल धनगर ओबीसी समाजाच्या वतीने ओबीसी नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके सर यांच्या उपस्थितीमध्ये धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा विलास नेमाने, संतोष देवकते, अविनाश कांडुरे, अर्जुन भुतकर, विशाल देवकते राज अर्जुन, विजय धायगुडे, कल्याण कस्पटे शंकर गावडे दत्ता आबुज मनोज कोरडे यांनी दिला आहे.



# गोदाम व्यवस्थापकाची संवेदनशीलता

## तात्काळ शिधापत्रिका देऊन दिव्यांग व्यक्ती आणि निराधार महिलेच्या चेहऱ्यावर फुलवले हसू

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सरकारी कार्यालयातील लालफितीच्या कारभाराचा अनुभव अनेकांना येतो, मात्र अंबाजोगाई महसूल विभागाने याला छेद दिला आहे. एका दिव्यांग व्यक्तीची आणि अत्यंत गरीब महिलेची हलाखीची परिस्थिती पाहून, गोदाम व्यवस्थापकांनी पुढाकार घेत त्यांना तात्काळ शिधापत्रिका (रेशनकार्ड) देऊन माणुसकीचे दर्शन घडवले आहे. सरकारी काम आणि सहा महिने थांब असे सार्वत्रिकपणे बोलल्या जाते. पण, याला छेद देणारी अनेक चांगली माणसं सरकारी यंत्रणेत कार्यरत असतात. महसूलच्या पुरवठा विभागाचा असाच चांगला प्रसंग पाहता आला. अंबाजोगाई तहसील कार्यालयांतर्गत गोदाम व्यवस्थापक या पदावर कार्यरत असलेल्या शेख वसीम शेख खाजा यांनी संवेदनशीलता जोपासत शिधापत्रिकेपासून वंचित असलेल्या दिव्यांग व्यक्ती आणि एका वृद्ध निराधार महिलेस तात्काळ शिधापत्रिका (रेशनकार्ड) देवून त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. शासनाच्या वतीने दिव्यांग, भूमिहीन, कामगार, निराधार, विधवा महिला आणि अत्यंत गरीब कुटुंबे यांना प्राधान्याने तात्काळ शिधापत्रिका (रेशनकार्ड) उपलब्ध करून दिले जाते. अशा शिधापत्रिका (रेशनकार्ड) चा उपयोग दरमहा मोफत किंवा सवलतीच्या दरात धान्य मिळते, विविध शासकीय योजनांसाठी शिधापत्रिका (रेशनकार्ड) आवश्यक असते. परंतु, अनेकदा बऱ्याचजणांना शिधापत्रिका (रेशनकार्ड) मिळवण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे, पुरावे सादर करणे शक्य होतेच असे नाही. त्यामुळे पात्र असूनही योग्य ते लाभार्थी शिधापत्रिका (रेशनकार्ड) पासून वंचित राहतात. अंबाजोगाईत असेच दोन लाभार्थी सामाजिक कार्यकर्ते वाजेदभाई शेख यांनी महसूल प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. यातील पहिल्या प्रसंगातील लाभार्थी कमलखोर नाबासिंग भोंड (वय ८२ वर्षे) नामक ही महिला मागील अनेक वर्षांपासून जुने जेल, येल्डा रोडच्या बाजूस छोट्याशा झोपडीमध्ये राहत होती. सदरील महिला भंगार मधील पत्रे घेऊन त्याचे डब्बे बनवून रोडवर विकत असे. या महिलेचा पती व मुलगा मयत झाले आहेत. हि एकटी निराधार वृद्ध महिला मजूरी करून आपली उपजीविका भागवत आहे. सदर महिला नेहमी आजारी असते. तिची देखभाल करण्यासाठी सुद्धा कोणी नाही. त्यात रस्ता रूंदीकरण झाल्यामुळे या महिलेचे राहते घर म्हणजे मोडकळीस आलेली झोपडी. ती झोपडी ही तोडण्यात आली. डोक्यावरील छप्पर गेल्याने ही महिला एकटी रोडवर रडत बसली होती. योगायोग असा की, कमलखोर नाबासिंग भोंड (वय ८२ वर्षे) या असाह्य महिलेला त्या रस्त्याने जात असताना गोदाम व्यवस्थापक शेख वसीम शेख खाजा यांनी स्वतः पाहिले. त्यांनी तिथे थांबून त्या वृद्धेची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. माहिती घेतली. सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. दुसरा प्रसंग असा की, कलीम सत्तार शेख हा मुलगा जो ८० टक्के विकलांग आहे. अशा अवस्थेत ही तो आपली व कुटुंबाची उपजीविका भागवतो. त्याच्यासह घरी दोन भाऊ, आई आणि वडील. त्यात वडील दिव्यांग व भाऊ ही मतिमंद आहेत. त्यामुळे ते घरीच झोपून असतात. झाले असे की, काही दिवसांपूर्वी कलीम सत्तार शेख याने दान मागण्यासाठी आपले हात गोदाम व्यवस्थापक शेख वसीम शेख खाजा यांच्या पुढे केले. त्यावेळी गोदाम व्यवस्थापक शेख यांनी कलिम याची पूर्ण विचारपूस केली. माहिती घेतली. कलिम याची हकीकत ऐकून त्याला ही सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. गोदाम व्यवस्थापक कलिमला म्हणाले की, बेटा मी तुला आयुष्यभरासाठी उपयोगी पडेल अशी मदत एकदाच करणार आहे. तुझ्या घरातील सर्वांचे आधारकार्ड तहसील कार्यालयात घेऊन ये असे सांगितले, असता दुसऱ्याच दिवशी दिव्यांग कलीम याने शेख वसीम शेख खाजा (गोदाम व्यवस्थापक) यांची भेट घेऊन त्यांना आवश्यक ती कागदपत्रे दिली.



पान १ वरून

### आ.नमिता...

ही आकडेवारी केवळ धक्कादायक नसून समाजासाठी चिंतेची बाब असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. नमिता मुंदडा यांनी केवळ राष्ट्रीयच नव्हे तर महाराष्ट्रातील आणि विशेषतः मराठवाड्यातील परिस्थितीवर सरकारचे लक्ष वेधले. मुंबईसारख्या शहरात २०२४ मध्ये हुंडा छळाची ४३० प्रकरणे नोंदवली गेली असून २०२५ च्या सुरुवातीच्या काही महिन्यांतच ही संख्या १६० च्या पार गेली आहे. बीड जिल्ह्यातील परिस्थिती आणि पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाचा उल्लेख करत त्यांनी हुंडा घेणाऱ्या कुटुंबांवर सामाजिक बहिष्कार आणि कडक कायदेशीर कारवाईची मागणी केली. त्यांनी सरकारला पाच महत्त्वाचे प्रश्न विचारले ज्यामध्ये गेल्या पाच वर्षातील गुन्ह्यांची संख्या, दोषींना झालेली शिक्षा, एफआयआर नोंदणीसाठी लागणारा वेळ आणि जनजागृतीसाठी राबवलेले उपक्रम यांचा समावेश होता. सरकारच्या वतीने उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी गेल्या पाच वर्षातील पोलीस कारवाईची आकडेवारी सभागृहात सादर केली. २०२१ मध्ये १७२ गुन्हे नोंदवून ५३४ जणांना अटक करण्यात आली होती, तर २०२४ मध्ये ही संख्या १३९ गुन्ह्यांपर्यंत खाली आली आहे. २०२५ मध्ये आतापर्यंत १३८ गुन्हे नोंदवण्यात आले असून २१३ आरोपींना अटक केली आहे. हुंडा प्रतिबंधक कायदा अधिक कडक करण्याबाबत शासन सकारात्मक असून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'लाडकी बहीण' योजनेसोबतच मोफत उच्च शिक्षण आणि बचत गटांच्या माध्यमातून मोठे प्रयत्न सुरू असल्याचे मंत्र्यांनी स्पष्ट केले.

## प्रतिक्रिया पाठवा...

# मराठवाडा पत्र चा ५ वा वर्धापन दिन

आपल्या सर्वांच्या आवडीचे लोकप्रिय दैनिक मराठवाडा पत्र गुरूवार (दि.१९ मार्च २०२६) रोजी पाच वर्ष पूर्ण करत यशस्वीपणे सहाव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे... या पाच वर्षात आपण आम्हाला भरभरून प्रेम दिले... कोरोना महामारी सारख्या भिषण संकट काळात देखील आपण साथ दिली... पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आम्ही १९ मार्च रोजी विशेषांक प्रकाशित करत आहोत... या अंकात तुमची प्रतिक्रिया आम्हाला हक्काने हवी आहे... पुढील वाटचालीसाठी आपल्या प्रतिक्रिया हेच आमचे बळ आहे... यामुळे आपण खालील ई- मेल आयडीवर किंवा व्हॉट्सअॅप क्रमांकावर प्रतिक्रिया पाठवाव्यात... दै. मराठवाडा पत्र परिवार आपल्या प्रतिक्रिया जानुन घेण्यासाठी उत्सुक आणि आतुर आहे...

दि. १७ मार्चपर्यंत आपल्या प्रतिक्रिया पाठवाव्यात. सोबत आपला पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्य पाठवावा... आपल्या बोलक्या प्रतिक्रिया १९ मार्चच्या अंकात आम्हाला प्रसिध्द करायच्या आहेत...

■ प्रतिक्रीया पाठवण्यासाठी...
व्हाट्सअॅप नं. 9822152955
ई-मेल: Email-dailyamarathwadapatra2021gmail.com

दत्तात्रय नरनाळे
(संपादक : दै. मराठवाडा पत्र)




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# आहार व तणाव रहित जीवन यावरच मानवी आरोग्य अवलंबून आहे : युवासंत चंद्रकांत (दादासाहेब) मोरे

## परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे अभिष्टचिंतन निमित्त महा आरोग्य तसेच रक्तदान शिबीर संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स माजलगाव च्या तर्फे आयोजित परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त महा आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी युवासंत चंद्रकांत (दादासाहेब) मोरे बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, आपले आरोग्य आपल्या आहारावर अवलंबून आहे, मानवी आरोग्यासाठी षड्रस आवश्यक असते. सकस, सेंद्रिय अन्न यामुळे आरोग्य सुदृढ राहते. याबरोबरच आयुर्वेद, आजीबाईचा बटवा, घरगुती दैनंदिन वापरातील औषधी वस्तू याविषयी अनमोल माहिती दिली. मानवी आरोग्याचे दुसरे



महत्त्वाचे कारण म्हणजे ताणतणाव आहे. आरोग्यदायी जीवनासाठी तणाव रहित राहिले पाहिजे. या शिबीराची सुरुवात दीपप्रज्वलन, श्री स्वामी समर्थ महाराज, धन्वंतरी, छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पूजन करून झाले. यावेळी भव्य रक्तदान शिबीरही घेण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये २१३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या महा आरोग्य शिबीरात सर्व रोगांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. या शिबीराचे प्रास्ताविक करताना डॉ यशवंत राजेभोसले यांनी या महा आरोग्य शिबीराचे वैशिष्ट्य व पार्श्वभूमी मांडली. गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट च्या निर्मितीपासून आजपर्यंत ची यशस्वी वाटचाल ही भगवान दत्तस्वरूप श्री स्वामी समर्थ महाराज व परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने चालू आहे. इवलेसे रोप लावियेले द्वारी! त्याचा वेलु गेला गगनावरी! फार्मसी कॉलेज सुरू केले आज बी ए एम एस, नर्सिंग, फिजिओथेरपी इत्यादी शिक्षणाची दारे खुली झाली याचे सर्व श्रेय परमपूज्य गुरुमाऊलींचे आहे म्हणूनच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अड कॅन्सर रिसर्च सेंटर हे नाव युनिटला दिले. यानंतर कॅन्सर तज्ञ डॉ. नंदकुमार पाणसे यांनी आपल्या मनोगतातून सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर चे सामाजिक उपक्रम व गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट ने आयोजित केलेले महा आरोग्य शिबीर हा स्तुत्य उपक्रम आहे .

## पिंपळनेरसह ग्रामीण भागात पुन्हा चुली पेटल्या

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर वाढत चाललेल्या युद्ध परिस्थितीचा परिणाम आता सर्वसामान्यांच्या जीवनावरही दिसू लागला आहे. इंधन दरवाढ, गॅस सिलिंडरच्या किंमतीत झालेली वाढ तसेच महिन्याला एकच सिलिंडर मिळणार असल्याच्या चर्चामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांची आर्थिक गणिते विस्कळीत झाली आहेत. काही ठिकाणी पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात सध्या घरगुती गॅस सिलिंडरचे दर वाढल्याने अनेक कुटुंबांना गॅसचा वापर कमी करावा लागत आहे. त्यातच महिन्याला मर्यादित सिलिंडर मिळण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. आधीच शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

---

**अवसायक (Liquidator)**

**श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड तथा उपनिबंधक, सहकारी संस्था ता.बीड**

Email Id- liquidatorsairammultistate@gmail.com

जा.क्र. /अवसायक/साईराम मल्टीस्टेट/ पदभरती /2026 दि. 05/03/2026

श्री साईराम अर्बन मल्टिस्टेट को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लि.बीड (अवसायनात ) या संस्थेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे रिक्त जागा भरणे आहे

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणीक पात्रता |
|---|---|---|---|
| 1 | लिपिक | 03 | कोणत्याही शाखेचा पदवीधर तसेच संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक |

इच्छुक उमेदवारांनी दिनांक 12 /03/2026 रोजी अवसायक, श्री साईराम अर्बन मल्टिस्टेट को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लि.बीड (अवसायनात ) तथा उपनिबंधक,सहकारी संस्था तालुका बीड यांचे कार्यालय, सहकार शक्ती इमारत,जालना रोड बीड येथे सकाळी 11:00 ते दुपारी 02:00 वाजेपर्यंत या वेळेत आपल्या मूळ कागदपत्रासहित मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

(एस.बी.घोडके)
अवसायक
श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड तथा उपनिबंधक, सहकारी संस्था ता.बीड

---

# विशाल पवार यांच्या तर्फे पाणी बॉटल व चहा वाटप

## श्रीक्षेत्र देगलूर ते श्रीक्षेत्र मैलार दिंडीस सुरुवात

**देगलूर । प्रतिनिधी**

सद्गुरु श्री गुंडा महाराज संस्थान श्रीक्षेत्र देगलूर येथून श्रीक्षेत्र मैलार येथे सद्गुरु श्रीगुंडामहाराजांचा पालखी सोहळा दरवर्षी प्रमाणे याही वर्षी निघाली असून यांचं मुख्य कारण असे कि या क्षेत्राचे वर्णन श्रीगुंडामाहात्म्यात आले आहे. एकदा महाराजांच्या तपोभूमीत श्रीरामपूरला प्रकट होऊन श्रीम्हाळसाकांताने त्यांना मैलारला बोलाविले, महाराजांचे तेथे जाणे झाल्यावर श्रीमल्लारीने त्यांचा यथायोग्य सन्मान केला महाळसापती सुमनमाळा। स्वकरे पाली गुंडाचे गळा । (श्रीगुंडामाहात्म्य १३/१११) त्याच प्रसंगाचे सस्मरण म्हणून महाराजांची पालखी दिंडीसोहळ्याने श्रीक्षेत्र मैलारला



जाते.देव-भक्तांच्या भेटीचा अपूर्व सोहळा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक या दिंडी सहभागी होतात. सदरील पालखीचे मुक्काम राम मंदिर गवंडगाव येथे झाला.या पालखी सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी गवंडगाव चौरस्ता येथे कै. परशुराम पवार व कै गोविंद राठोड कारभारी यांच्या स्मरणार्थ शेकडो भाविकांना

---

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती वंदना व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड याच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३५९/२०२६**

**अशोक पि. गोपीनाथराव कुरकुटे ईतर वि. निरंक**

अर्जदार - १. अशोक पि. गोपीनाथराव कुरकुटे, वय ६८ वर्षे, धंदा-पेन्शनर, रा. हिरालाल चौक, साळ गल्ली, बीड ता.जि. बीड. ह.मु. दत्त नगर, परभणी, ता. जि. परभणी. २. गणेश पि. गोपीनाथ कुरकुटे, वय - ५४ वर्षे, धंदा- मजूरी. रा. हिरालाल चौक, साळ गल्ली, बीड ता.जि.बीड. ३. रत्नमाला भ्र. कचरु म्हेत्रे, वय-६० वर्षे, धंदा-घरकाम रा. रायमोह ता. शिरुर कासार, जि. बीड. ४. महानंदा भ्र. ज्ञानेश्वर पारखे, वय - ५८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मस्के कॉलनी, पाथर्डी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर. ५. सुनिता भ्र. तुकारामराव रोडे, वय ५० वर्षे, धंदा-घरकाम, रा. कारेगांव रोड, ममता कॉलनी, परभणी, ता. जि. परभणी

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण:- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क. १ ते ५ यांनी शांताबाई भ्र. गोपीनाथ कुरकुटे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत शांताबाई भ्र. गोपीनाथ कुरकुटे हया दिनांक २५/१२/२०२५ रोजी हिरालाल चौक, साळ गल्ली, बीड, ता.जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क.१ व २ हे मयताचे मुले असुन तसेच अर्जदार क. ३ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत मयताचे पती नामे गोपीनाथराव बंडुजी कुरकुटे हे दिनांक २४/०८/१९९८ रोही मयत झालेले आहेत. अर्जदारांशिवाय मयतास ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे शांताबाई भ्र. गोपीनाथ कुरकुटे यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वानी नोंद घ्यावी. **पुढील तारीख २३/०४/२०२६.**

आज दिनांक १०/०३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**(अॅड. ए. व्ही. मोत्र यांच्या मार्फत)**

शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक — आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

---

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३५२ / २०२६**

**सुरेखा दहिवाळ वि. निरंक**

ज्यापेक्षा विलास उत्तमराव दहिवाळ हे दिनांक २९/११/२०२५ रोजी उपजिल्हा रुग्णालय, इंदापुर, जि. पुणे येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

१. सुरेखा भ्र. विलास दहिवाळ वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. मांडवजाळी, ता. जि. बीड. २. ओंकार पि. विलास दहिवाळ, वय. १६ वर्षे, धंदा. शिक्षण रा. वरीलप्रमाणे. ३. श्रावणी पि. विलास दहिवाळ, वय १३ वर्षे, धंदा. शिक्षण, अज्ञान अर्जदार क्र. २ व ३ करीता अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ सुरेखा भ्र. विलास दहिवाळ, रा. वरीलप्रमाणे. ४. उत्तम पि. बप्पाजी दहिवाळ, वय ९२ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे, अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा असुन, अर्जदार क. ३ ही मयताची मुलगी आहे, अर्जदार क्र. २ व ३ हे अज्ञान असुन त्यांची अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ आहे. अर्जदार क्र. ४ हे मयताचे वडिल आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे विलास उत्तमराव दहिवाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी,

**प्रकरणाची पुढील तारीख ०६/०४/२०२६ ही आहे.**

आज दिनांक १० मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**(अॅड आर.जे. दहिवाळ यांचे मार्फत)**

शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक — आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

---

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती एम एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३२/२०२६**

**चंदू पि. गणपतराव सुपेकर व इतर व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- **१. चंदू पि. गणपतराव सुपेकर, वय-३८, वर्षे, धंदा-शेती रा. एम एस ई बी. ऑफीस जवळ, लगड निवास, माळीवेस, बीड ता. जि. बीड. २. दत्ता पि. गणपतराव सुपेकर, वय-३६, वर्षे, धंदा-शेती रा. स्नेहनगर बीड, ता. जि. बीड. ३. मजाबाई भ्र. चंद्रसेन सुपेकर, वय-९२, वर्षे, धंदा-काही नाही. रा. एम एस ई बी. ऑफीस जवळ, लगड निवास, माळीवेस, बीड ता. जि. बीड. ४. रंजना भ्र. गणपतराव सुपेकर, वय-५८, वर्षे, धंदा-घरकाम रा. शिवणी, ता. जि. बीड. ५. वैशाली भ्र. अमोलराव जाधव, वय-३८, वर्षे, धंदा-घरकाम रा. महाराष्ट्र बँक कॉलनी, बीड ता. जि. बीड.** (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत गणपत पि. चंद्रसेन सुपेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत गणपत पि. चंद्रसेन सुपेकर यांचा मृत्यु दिनांक १४.११.२०२५ रोजी वयोवृध्द झालेने मौजे शिवणी, बीड ता. जि. बीड** येथे झाला असुन अर्जदार क १ व २ हे मयताचे मुल अर्जदार क ३ मयताची आई तर अर्जदार क ४ मयताची पत्नी असून अर्जदार क ५ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत गणपत पि. चंद्रसेन सुपेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२ जानेवरी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १३/०३/२०२६ आहे.**

**(अॅड. एस एस साळवे यांच्यामार्फत)**

शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक — आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

---

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२६/२०२६**

**सुमन गंगावणे वि. निल**

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

अर्जदारः १) सुमन भ्र. नायबराव उर्फ नायबा गंगावणे, वयः ७५वर्षे, धंदा घरकाम, २) रेवनाथ पि. नायबराव उर्फ नायबा गंगावणे, वय: ३९ वर्षे, धंदा: नौकरी, ३) शिवनाथ पि. नायबराव उर्फ नायबा गंगावणे, वय: ३५वर्षे, धंदा शेती, ४) मुरली पि. नायबराव उर्फ नायबा गंगावणे, वय: ३३ वर्षे, धंदा: नौकरी, सर्व रा. जुजगव्हाण, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यानी या न्यायालयात याचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी **मयत नामे नायबराव उर्फ नायबा भानुदास गंगावणे, राहणार जुजगव्हाण, ता. जि. बीड हे दिनांक २१/०५/२०२४ रोजी जुजगव्हाण ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील पुर्वीच मत झालेले आहेत.

मयत नामे नायबराव उर्फ नायबा भानुदास गंगावणे, यांचे निधन झालेले आहे मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते को, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर तरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदर अर्जदार हा हक्काबद्दल लागलीच पुरावा व त्याचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत नायबराव उर्फ नायबा भानुदास गंगावणे यांचे वारस असल्याबाबत प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०६/०४/२०२६ आहे.

**(विधीज्ञ श्री. गणेश शिंदे)**

शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक — आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर बीड

---

## जाहिर प्रगटन

अर्जदार रमेश पिता शंकरराव दळवे वय ६५ वर्षे व्यवसाय झेरोक्स दुकान चालक रा. जयवंतीनगर अंबाजोगाई जि. बीड मो.नं. ९३७२०२३४११ यांनी पो. स्टे ला येवून अर्ज दिला की, माझे कै.माऊली महाराज चाकरवाडी संस्था केज या संस्थेची नोंदनी क. F-9926 असा असुन धर्मदाय नोंदनी प्रमाणपत्र तसेच महाचे मुळ दोन्ही प्रमाणपत्र दि.२४/०२/२०२६ रोजी १५.०० वाजता बसस्थानक अंबाजोगाई ते बीड प्रयास मध्ये गहाळ झाली आहे जर कोणाला मिळाले तर वरील नंबर वर संपर्क साधावा ही विनंती.

(स्वाक्षरीत)
रमेश पिता शंकरराव दळवे
रा. जयवंतीनगर अंबाजोगाई जि. बीड

शिक्का

---

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३६३/२०२६**

अर्जदार- (१) **जानकाबाई भ्र. दगडु बावणे, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. घर नं. ८-२५३, लहाने हॉस्पिटलच्या पाठीमागे, विद्यानगर, बार्शी रोड, ता. बीड जि. बीड. २) सुधाकर पि. दगडुराव बावने, वय ४८ वर्षे, धंदा-नौकरी, रा. विद्यानगर पश्चिम, ता. बीड, जि. बीड. (३) आशा भ्र. पद्माकर हजारे, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सावरकर नगर, N - ५ सिडको, ता. जि. संभाजीनगर. (४) सारिका भ्र. राजाभाऊ येवले, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. चौरे इस्टेट, संस्कार कॉलनी, जालना रोड, ता. जि. बीड** विरुध्द

गैरअर्जदार : निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे दगडू साहेबराव बावणे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **दगडू साहेबराव बावणे, रा. घर नं. ८-२५३, लहाने हॉस्पिटलच्या पाठीमागे, विद्यानगर, बार्शी रोड, ता. जि. बीड हे दिनांक ०२/०५/२०२५ रोजी राहत्या घरी विद्यानगर बार्शी रोड बीड, ता. जि. बीड येथे मयत** झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क. ३ व ४ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई वडील हे या पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक ०६/०४/२०२६.** आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(अॅड. बेदरे के. व्ही. यांच्यामार्फत)**

शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक — आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर बीड

---

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड़ ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३३७/२०२६**

**रुक्मीण वि. निल**

मागणी - बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

अर्जदारः **(१) रुक्मीण भ्र. सिताराम काटकर, वयः ७३ वर्षे, धंदा घरकाम, रा. धावज्याची वाडी, ता. जि. बीड (२) मनिषा भ्र. कल्याण काटकर, वयः ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. धावज्याची वाडी, ता. जि. बीड ह.मु. शिवाजी पुतळ्या जवळ, पिंपरी गाव, पुणे ता. हवेली जि. पुणे. (३) आकाश पि, कल्याण काटकर, वयः २८ वर्षे, धंदा नौकरी, रा. वरील प्रमाणे ४) अभिषेक पि. कल्याण काटकर, वयः २६ वर्षे, धंदाः नौकरी, रा. वरील प्रमाणे**

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे कल्याण सिताराम काटकर, राहणार धावण्याची वाडी, ता. जि. बीड हे दिनांक २२/०७/२०२५ रोजी धावल्याची वाडी, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ हि मयताची आई असुन अर्जदार क. २ हि मयताची पत्नी तर अर्जदार क. ३ व ४ मयताचे मुले आहेत. मयत नाम कल्याण सिताराम काटकर, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत स्थानी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा पेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत कल्याण सिताराम काटकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/०४/२०२६ आहे.** आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ -श्री. अभिषेक हजारे)**

शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक — आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर बीड

---

## जाहीर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**

**Under the Consumer Protection Act, 2019**

**CONSUMER CASE NO. DC/470/CC/657/2024**

**Petitioner / Appellant - ADV AJIT MURLIDHAR DESHMUKH**

**Versus**

**Opposite Party / Respondent Name: - JIJAU MASAHEB MULTI STATE CO OP CREDIT SOCIETY LTD BEED THROUGH BRANCH MANAGER ASHWINI SUNIL WANDHRE**

**To.**

**Opposite Party / Respondent(s)**

**1. JIJAU MASAHEB MULTI STATE CO OP CREDIT SOCIETY LTD BEED THROUGH BRANCH MANAGER ASHWINI SUNIL WANDHRE MAIN OFFICE FRONT OF JIJAU STATUE RAJIV GANDHI CHOWK CANAL, ROAD BEED TQ. DIST BEED, MAHARASHTRA 2: ANITA BABAN SHINDE- JIJAU MASAHEB MULTI STATE CO OP CREDIT SOCIETY LTD BEED MAINGAR OFFICE FRONT OF JIJAU STATUE RAJIV GANDHI CHOWK CANAL ROAD BEED TQ. DIST BEED, MAHARASHTRA. 3. RAMBHAU DAMU KAMBALE- JIJAU MASAHEB MULTI STATE CO OP CREDIT SOCIETY LTD BEED MAIN OFFICE FRONT OF JIJAU STATUE RAJIV GANDHI CHOWK CANAL ROAD BEED TQ. DIST BEED, MAHARASHTRA**

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे.यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड यांची आदेशानुसार

दिनांक - २४/०२/२०२६

ठिकाण - बीड.

शिक्का — (स्वाक्षरीत) प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.

---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७६/२०२६**

**आसाराम पि. सातीराम माने वि. निरंक**

ज्याअर्थी **मयत नामे सातीराम पि. रामभाउ माने रा. भाटेपुरी, ता. गेवराई जि.बीड हे / हया दिनांक ११/१२/२०२४ रोजी भाटेपूरी ता. गेवराई जि.बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, **अर्जदार आसाराम पि. सातीराम माने वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. भाटेपुरी ता. गेवराई जि.बीड** यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सातीराम पि. रामभाउ माने यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०७/०३/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**पुढील तारीख - १५/०४/२०२६**

**(मार्फत - अॅड आर.ए. जोशी, गेवराई)**

शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक — आदेशावरून (स्वाक्षरीत) सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरुवार दि. १२ मार्च २०२६ ●

## थोडक्यात...

### बीड ग्रंथोत्सव-२०२५ समन्वय समितीची बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण - २०१० अंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड आयोजित बीड ग्रंथोत्सव-२०२५ च्या समन्वय समितीची बैठक दि.११ मार्च २०२६ रोजी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड येथे सहाय्यक ग्रंथालय संचालक छत्रपती संभाजीनगर सुनिल हुसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.बीड प्रियाराणी पाटील, श्रीकृष्ण डोईफोडे प्रतिनिधी, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बीड, सुधीर चाटे, अध्यक्ष, बीड जिल्हा ग्रंथालय संघ व संजय शा.मस्के जिल्हा ग्रंथालय अधिकारी, बीड हे उपस्थित होते. सर्वप्रथम या बैठकीतील उपस्थित सदस्यांचे श्री.संजय शा.मस्के, जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांनी ग्रंथभेट देवून स्वागत केले. या बैठकीमध्ये ग्रंथोत्सव - २०२५ चे आयोजन व त्यामध्ये घेण्यात येणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम यावर चर्चा होवून ग्रथोत्सव-२०२५ चे आयोजन दि.२७ व २८ मार्च २०२६ रोजी र.भ.अटल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय , गेवराई येथे करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. बैठकीच्या शेवटी बा.पा.पठाण, वरिष्ठ लिपिक यांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानले.

### जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ओमराजे परमेश्वर सातपुते प्रथम



**बीड । प्रतिनिधी**

द.बा. घुमरे पब्लिक स्कूल, बीड च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये चंपावती शाळेच्या वतीने सहभागी झालेल्या ओमराजे परमेश्वर सातपुते यांनी उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्य दाखवत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल ओमराजे यांना माजी आमदार राजेंद्रजी जगताप साहेब, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अरुण नाना डाके, उद्योजक रमेश भाऊ पोकळे, छत्रपती संभाजी राजे शिक्षण प्रसारक मंडळ पारगावचे सचिव दिपकरावजी घुमरे आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोख ५१०० रुपये पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी तसेच शिक्षक व पालकांनी त्यांचे कौतुक केले. चंपावती शाळेचे मुख्याध्यापक तसेच शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनामुळे ओमराजे यांनी हे यश संपादन केले. शिक्षकांनी दिलेले प्रोत्साहन, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण सराव यामुळेच त्यांची वक्तृत्वकला अधिक उजळून निघाली. ओमराजे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या या यशामुळे चंपावती शाळेचे तसेच पालकांचे नाव उज्ज्वल झाले आहे.

### अडुळा वाळू घाटावर माफियांची खुलेआम लूट ; प्रशासनाची संशयास्पद शांतता !

**रात्रंदिवस सुरू बेकायदेशीर वाळू उपसा ; ग्रामस्थांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष - महसूलही कोट्यवधींनी बुडतोय**



**माजलगाव । प्रतिनिधी**

अडुळा परिसरातील वाळू घाटावर बेकायदेशीर वाळू उपसा थांबण्याचे नाव घेत नाही. उलट दिवसेंदिवस माफियांचा उच्छाद वाढत असून प्रशासन मात्र संशयास्पद शांततेत असल्याची भावना स्थानिकांमध्ये निर्माण झाली आहे. पहिल्या भागात या प्रकरणातील गंभीर बाबी समोर आल्यावरही संबंधित यंत्रणांनी कोणतीही ठोस कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अडुळा नदीपात्रात मोठमोठ्या मशीनच्या साहाय्याने रात्रंदिवस वाळू उपसा केला जात आहे. ट्रॅक्टर आणि डंपरच्या मदतीने हजारो ब्रास वाळू बाहेर काढली जात असून नदीचे नैसर्गिक स्वरूप धोक्यात आले आहे. पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असताना संबंधित विभाग मात्र कारवाईकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे. स्थानिक ग्रामस्थांनी महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाकडे वारंवार तक्रारी दिल्या असल्याचे सांगितले जाते. मात्र, या तक्रारींवर ठोस पावले उचलली गेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. काही ठिकाणी तर माफियांच्या दबावामुळे अधिकारी कारवाई करण्यास कचरत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. बेकायदेशीर वाळू उपशामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असूनही संबंधित यंत्रणा गप्प का आहे, असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत. प्रशासन नेमके कोणाच्या दबावाखाली आहे ? असा थेट सवालही स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, अडुळा वाळू घाटावरील हा प्रकार तात्काळ थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा स्थानिकांकडून देण्यात आला आहे.

### पिंपळनेर भागात ज्वारीचे क्षेत्र घटल्याने ; गरिबांची भाकरी महागणार

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात ज्वारी उत्पादनाचा वाढता खर्च, मात्र उत्पन्नाचे प्रमाण कमी त्यातून अतिवृष्टी व हवामानाचा परिणाम या सगळ्यांचा विचार करता ज्वारी उत्पादन घेणे शेतकऱ्यांना परवडत नाही. शिवाय २०२० पासून पाण्याची उपलब्धता झाल्याने शेतकऱ्यांनी बागायती क्षेत्र वाढवत फळबागा, पालेभाज्या व फळभाज्या यासारखी उत्पादन घेणे पसंत केले आहे. तर जनावरांचा चाऱ्यासाठी मका उत्पादित केला जात आहे. परिणामी ज्वारीचे पीक घटत चालले असून मागील ४ वर्षात तब्बल १ हजार ५० क्षेत्रावरील ज्वारीचे पीक घटले आहे. सध्या ज्वारीचा किरकोळ विक्री दर ४० ते ४५ प्रतिकिलो झाला असल्याने भविष्यात गरीबाची भाकरी महागणार असे चित्र दिसत आहे. रस्ते, लोकवस्ती व इतर कारणांनी घटणारे जमिनीचे क्षेत्रफळ, उत्पादन खर्च जास्त व उत्पन्न कमी शिवाय बागायती क्षेत्र वाढविण्याकडे शेतकऱ्यांचा ओढा या सगळ्या कारणाने रब्बी हंगामात ज्वारीचे पीक अगदी तुरळक ठिकाणीच दिसत आहे.

# मुळुकवाडी - मसेवाडी शिवरस्त्याचा 25 वर्षांपासूनचा प्रश्न मार्गी

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे ग्रामस्थांकडून आभार : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील मुळुकवाडी ग्रामपंचायत हद्दीतील मुळुकवाडी ते मसेवाडी शिवरस्त्याचा प्रश्न तब्बल २५ वर्षांपासून प्रलंबित होता. भूमी अभिलेख कार्यालयात तीन वर्षांपूर्वी २१ हजार रुपये मोजणी शुल्क भरूनही प्रत्यक्ष मोजणी होत नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. अखेर वस्तीवरील ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर तहसीलदार शेळके यांनी कठोर भूमिका घेत पोलिस बंदोबस्तात रस्त्याच्या खुणा करून देत रस्ता मोकळा करून दिला. सरपंच रामकिसन कदम व पांडुरंग कानडे यांनी पुढाकार घेऊन रस्त्याचे काम सुरू केल्यामुळे पावसाळ्यात ग्रामस्थांना होणारी अडचण दूर झाली आहे. याबद्दल ग्रामस्थांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आभार मानले आहेत.



**पावसाळ्यातील अडचण दूर - ग्रामस्थ :** पावसाळ्यात शाळा सुरू झाल्यानंतर शाळकरी मुलांना गुडघाभर चिखलातून शाळेत जावे लागत होते. तसेच आठवडी बाजार, भाजीपाला, दूध-दुभते, खत-बियाणे आणणे तसेच दवाखान्यात जाण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत होती. तहसीलदार शेळके यांच्या सहकार्यामुळे ही २५ वर्षांपासूनची समस्या दूर झाली असून आम्ही त्यांचे उपकार आयुष्यभर विसरणार नाही, अशी भावना ग्रामस्थ शाकींदर काटकर यांनी व्यक्त केली.

**तहसीलदारांच्या कठोर भूमिकेमुळे प्रश्न सुटला - डॉ. ढवळे:** गेल्या २५ वर्षांपासून पावसाळ्यात ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. तीन वर्षांपूर्वी भूमी अभिलेख कार्यालयात २१ हजार रुपये मोजणीसाठी भरूनही मोजणी होत नव्हती. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला निवेदन देत तहसीलदार शेळके यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला. सुरुवातीला खुणा करूनही काही ग्रामस्थ सहकार्य करत नसल्याने शेवटी पोलिस बंदोबस्तात रस्ता मोकळा करण्यात आला. तहसीलदार शेळके यांच्या ठाम भूमिकेमुळे ग्रामस्थांचा २५ वर्षांपासूनचा प्रश्न मार्गी लागला, असे मत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.

## माजी आ. सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त माऊली गुरुकुलच्या वतीने शालेय साहित्य वाटप

**माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या कार्याचा गौरव**

**वडवली । प्रतिनिधी**

माळशिरस विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आणि धुरंदर नेते माजी आमदार श्री रामभाऊ सातपुते साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी तालुक्यातील मोरेवाडी जि. प. प्रा. शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन माऊली गुरुकुलचे प्रकल्प संचालक तुकाराम आप्पा सोनटक्के यांनी केले होते. वडवणी येथील माऊली गुरुकुल च्या वतीने नेहमीच सामाजिक उपक्रम



राबवले जातात. महाराष्ट्रातील नामवंत नेते आणि माळशिरस विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त देखील विविध उपक्रम वडवणी तालुक्यात राबविण्यात आले होते. माऊली गुरुकुल चे संचालक तुकाराम आप्पा सोनटक्के यांच्या नियोजनातून मोरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते प्रकाशभाऊ सोनटक्के, माजी सरपंच कारभारी वीर, उपसरपंच सुरेश मोरे, माजी उपसरपंच दत्ता सोनटक्के, गोरक्षनाथ शेवाळे, युवासेना तालुकाप्रमुख नवनाथ मोरे, ग्रामपंचायत सदस्य रवींद्र खराडे, सुरेश घनवट, शालेय समितीचे अध्यक्ष उमेश काळे, जीवन मोरे, विलास ढेंगे, सुरज मोरे, जीवन धुळूप आदी मान्यवर व पालक गावकरी उपस्थित होते. यावेळी तुकाराम सोनटक्के यांनी लोकप्रिय नेते रामभाऊ सातपुते यांच्या कार्याविषयी माहिती दिली. रामभाऊ सातपुते सारखा समाजशील आणि लोकांच्या सुखदु:खात सहभागी होणारा नेता दुर्मिळ असल्याचे वक्तव्य यावेळी तुकाराम सोनटक्के यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार लंगडे सर यांनी केले.

## चौसाळा राम जन्मोत्सवाच्या अध्यक्षपदी प्रसाद देशमुख तर सचिवपदी रविराज वेदपाठक

**उपाध्यक्ष आकाश काळे, कोषाध्यक्ष कुमार मिटकरी**

**चौसाळा । प्रतिनिधी**



रामनवमी निमित्त चौसाळा येथे राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो . राम जन्मोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष संदेशशेठ खिवंसरा यांच्या अध्यक्षतेखाली हनुमान मंदिरात बैठक संपन्न होऊन राम जन्मोत्सवाची कार्यकारिणी घोषित करण्यात आली मार्गदर्शक म्हणून बाळू काका नहार महादेव बाप्पा नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसाद ( बाबू) देशमुख यांना राम जन्मोत्सवाचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले तर उपाध्यक्ष म्हणून आकाश काळे कोषाध्यक्ष म्हणून कुमार मिटकरी सचिव म्हणून रविराज वेदपाठक यांची निवड करण्यात आली राम जन्मउत्सवाचा कार्यक्रम बंकट शिंदे, अक्षय भैय्या हुलजुते, महावीर लिंगे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पार पाडण्याचे या बैठकीत ठरवण्यात आले बैठकीमध्ये प्रसिद्धी प्रमुख म्हणून दैनिक कार्यारंभ चे पत्रकार व ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे, दैनिक लोकप्रश्न चे वार्ताहार विकास सर्वज्ञ यांची निवड करण्यात आली. चौसाळाचे प्रथम नागरिक बाबुशेठ लोढा, माझी सरपंच मधुकर तोडकर, अंगद शिंदे, अनेक मान्यवर व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांचेकडून पुरुषोत्तमपुरी मंदिर कामाची पाहणी , गावकऱ्यां कडून सत्कार

**माजलगाव । प्रतिनिधी**

अधिक मासाच्या पार्श्वभूमीवर पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तम मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. या काळात मंदिरातील व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी अधिक मासाच्या महिन्यापुरते मंदिरावर प्रशासक नेमण्याबाबत शासन दरबारी पाठपुरावा करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांच्याकडे केली. या पार्श्वभूमीवर जयसिंग भैय्या सोळंके यांनी पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तम मंदिराला भेट देत मंदिर परिसराची पाहणी केली. अधिक मासाच्या कालावधीत हजारो भाविक दर्शनासाठी येत असल्याने स्वच्छता, पिण्याचे पाणी, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा तसेच भाविकांच्या सोयीसुविधांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मंदिर परिसरातील व्यवस्थापन अधिक सक्षम व शिस्तबद्ध पद्धतीने व्हावे यासाठी अधिक मासाच्या कालावधीत तात्पुरता प्रशासक नेमल्यास



भाविकांना मोठा दिलासा मिळेल, असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. तसेच या मागणीसंदर्भात शासन स्तरावर पाठपुरावा करण्याची विनंती ग्रामस्थांनी सोळंके यांच्याकडे करत त्यांचा सत्कार केला. यावेळी दत्ता शिंदे, माजी उपसरपंच अशोक बप्पा धिरडे, शिवाजी गोळेकर, दिगंबर शेळके यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी जयसिंग भैय्या सोळंके यांनीही ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत शासन दरबारी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. अधिक मासात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने मंदिर परिसरात आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले

## भिम जयंतीची जय्यत तयारी

**बीड । प्रतिनिधी**

पंचशील नगर येथील त्रिरत्न बौद्ध विहार येथे (दि.१०) मार्च रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव २०२६ च्या नियोजनासाठी महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत यंदाची जयंती भव्य, दिव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्याचा सर्वांनी एकमताने निर्धार व्यक्त केला.बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी पंचायत समिती सदस्या मा. मीना (ताई) मस्के होत्या. यावेळी नगरसेवक प्रमोद (आण्णा) शिंदे, संजय मिसाळ, महेंद्र वडमारे, संतोष जोगदंड, के. के. वडमारे, अलका (ताई) डोंगरे व वंदना (ताई) पंडित यांनी मार्गदर्शन केले.

# बालाघाटावर शिवजन्मोत्सव उत्साहात

## वक्तृत्व स्पर्धा व सन्मान सोहळ्याचे आयोजन : नामदेव घोडके सर

**बीड । प्रतिनिधी**

बालाघाट प्रतिष्ठान, जिल्हा बीड यांच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ निमित्त बालाघाटावर प्रथमच भव्य दिव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ बालाघाट व परिसरातील विद्यार्थी, युवक-युवती तसेच नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन नामदेव घोडके सर यांनी केले आहे.

दि. १४ मार्च २०२६ रोजी



होणाऱ्या या कार्यक्रमामध्ये बालाघाट व परिसरातील पाली, मांजरसुंबा, लिंबागणेश, उदंडवडगाव, रौळसगाव, चौसाळा, जेबा पिंपरी, येळंब, मराठी कन्या नेकनूर, विठ्ठल पेठ नेकनूर आदी केंद्रांअंतर्गत येणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा १ ते ५, ५ ते ८ आणि ९ ते १२ अशा तीन गटांमध्ये होणार आहे. प्रत्येक गटातून प्रथम पारितोषिक ३१०० रुपये, प्रमाणपत्र व चषक, द्वितीय पारितोषिक २१०० रुपये, प्रमाणपत्र व चषक, तृतीय पारितोषिक ११०० रुपये, प्रमाणपत्र व चषक तसेच दोन उत्तेजनार्थ पारितोषिके ५०१ रुपये, प्रमाणपत्र व चषक अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. वक्तृत्व स्पर्धेची वेळ सकाळी ०९:४५ ते सायंकाळी ०४:०० अशी राहणार असून स्पर्धा संपल्यानंतर लगेचच सहभागी विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ तसेच सहभाग प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच २०२५ मध्ये बालाघाट परिसरातील जे युवक व युवती शासकीय सेवेमध्ये रुजू झाले आहेत, त्यांचा बालाघाट रत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या शुभहस्ते होणार असून डॉ. ज्योतीताई मेटे, तहसीलदार श्री. शेळके साहेब, श्री. सत्येंद्र पाटील सर, श्री. गंगाधर काळकुटे नाना, श्री. समंदर खान सर, श्रीमती गंगाखेडकर मॅडम, श्री. धर्मराज रसाळ सर व श्री. राहुल उंडाळे सर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी बालाघाट व परिसरातील सर्व शिवप्रेमी नागरिक, विद्यार्थी व मान्यवरांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन नामदेव घोडके सर यांनी केले आहे.